**रे.मु. नं ३४७/२०१९**
वैशाली दादासाहेब गोरे व १ वि.
आनंदराव विश्राम गोरे व इतर

## निशाणी २० खालील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादीने आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ प्रमाणे दाखल केला आहे.

**२.** अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे.

वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटप होवून मिळणेसाठी तसेच निरंतर ताकिद मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा दाखल करताना घाईगडबडीने व अनावधानाने प्रतिवादी क्र. ५ ते ६ यांच्या नावात व पत्त्यामध्ये चूक झाली असून व त्या चुकीमुळे दाव्यास पुढे तांत्रिक बाधा येवू नये म्हणून दुरुस्ती करणे आवश्यक आहे. वादीचे पुढे असेही कथन आहे की, प्रतिवादी क्र. ५ सौ. ज्योती संदीप याऐवजी सौ. स्वाती संदीप व रा. लोणी बु. ऐवजी तीनचारी कोल्हार बु. व प्रतिवादी क्र. ६ जयश्री भाउसाहेब ऐवजी ज्योती शंकरराव, रा. चितळी, ता. राहाता ऐवजी रा. जेलरोड, कुकडी कॉलनी, दत्त मंदिराजवळ, विसापूर, ता. श्रीगोंदा अशी दुरुस्ती होणे आवश्यक आहे. तसेच दावा परिच्छेद क्र. २ वंशावळीत ज्योती ऐवजी स्वाती व जयश्री ऐवजी ज्योती प्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्यात कुठल्याही प्रकारचा बदल होणार नाही, सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

**३.** प्रतिवादी क्रं १ ते ४ यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर हा खरा नसून प्रतिवादींची पुर्ण नावे दिली नसल्याचे कथन केले आहे. वादीने सदरचा अर्ज दाखल करण्यास उशिर केलेला आहे. सबब सदरचा अर्ज खारीज करण्यात यावा.

**४.** वादी व प्रतिवादीं यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रकरणात हजर होवून त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. परंतु प्रतिवादी क्र. ५ व ६ यांना अद्यापपावेतो नोटीसची बजावणी झाल्याचे दिसून येत नाही. वादीने

मागितलेल्या प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच दाव्यातील मागणीचे स्वरुप पाहता प्रस्तावित दुरुस्ती मंजूर करणे योग्य ठरेल. तसेच सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कुठले नुकसान देखील होणार नाही व मुळ वाद निकाली निघण्यासाठी मदतच होणार आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि. २० मंजुर करण्यात येतो.

२. वादीने आदेशापासून १४ दिवसांच्या आत सदरची दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

(ए. एस. देशपांडे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता

दि.११/०७/२०२२